

॥ श्रीराम ॥

## = झुळुक =

आता पावसाळा संपून हळूहळू उन्हाळ्याची चाहूल सुरू व्हायला लागली आहे. पण मधूनच वाऱ्याची झुळुक आली की माणसाला बरे वाटते.

ही वाऱ्याची झुळुक जेव्हां अंगावर आली त्यावेळी मला दामोदर अच्युत कारे यांच्या "वाटते मंद झुळुक मी व्हावे" या कवितेची आठवण झाली.

दामोदर कारे व बा.भ. बोरकर यांची गोव्याला भेट झाली. दोघेही मित्र असल्यामुळे कारे यांच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या.

वाऱ्याची झुळुक जशी सगळीकडे फिरते व सर्वांना आनंद देते त्याप्रमाणे कवीच्या मनाला असे वाटते की आपणही वाऱ्याप्रमाणे, वारा जसा सगळीकडे जातो, तसे आपणही स्वैरपणे सगळीकडे फिरावे.

कधी नदीच्या काठी, कधी आमराईत, कधी जुन्या वाड्यापाशी रमत गमत कानोसा घेत जावे. वाऱ्याची झुळुक ज्याप्रमाणे कधी फुलांवर, कधी वेळूच्या बनात जाऊन दाही दिशात फिरतो व सगळीकडे सुगंध उधळत जातो. तसे गाण्याची गोड लकेर गालशेतातून नदीकाठी गाण्याचे तरंग गात जावे. दिवसभर ~~दिवसभर~~ दमून आलेला कोणी दिसला तर त्याच्या मुखावर टवटवी तजेला आणून स्वच्छंदपणे मजा करून तिन्हीसांजेला विसावा घ्यायला घरी यावे.

— x —





शुभ दिपावली

सुनिता श्रीधर पटवर्धन.
फोन न. 9404413853